(SJIF) Impact Factor-8.575 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**March-2022**

ISSUE No- (CCCXLIII) 343

## INDIAN WOMEN: PRESENT, PAST AND FUTURE



Chief Editor
Prof. Virag S. Gawande

Editors

Dr. Babasaheb Shep,
Head of History Department

Dr. Ramesh Rathod,
Head, Department of Sociology

Dr. V. B. Gaikwad,
Department of Zoology

Vaidyanath College of Arts,Science & Commerce, Parli-Vaijnath

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 343 (CCCXXXVIII)
ISSN : 2278-9308
March, 2022

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिक राजकारणात महिला सहभाग | प्रा. डॉ.बापुराव वि.आंधळे | 1 |
| 2 | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील महिलांचे योगदान | बांगर स्वाती आदिनाथ | 4 |
| 3 | असंघटित क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण-एक अभ्यास | प्रा. डॉ. आंबादास पांडुरंग बर्वे | 8 |
| 4 | भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया | डॉ. बावलगावे सी. एम. | 13 |
| 5 | संततिनियमन चळवळीतील पहिल्या शिलेदार : मालतीबाई कर्वे | डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार | 17 |
| 6 | भारतीय स्त्रियांची सुरक्षा आणि दलित चळवळ | डॉ. किरण चक्रे | 22 |
| 7 | ग्रामीण भागातील स्त्रियांच्या समस्या | आबासाहेब माणिकराव देशमुख | 25 |
| 8 | पंडिता रमाबाई : प्रागतिक भूमिका व कार्य | प्रा. एम.पी.देशपांडे | 28 |
| 9 | आर्थिक सामाजिक समावेशनाचा स्त्रियांच्या सशक्तीकरणातील योगदान | डिके विनोद रमेश | 33 |
| 10 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग | डॉ. गंगणे अमोल उत्तमराव | 39 |
| 11 | भारतीय क्रांतीकारकांच्या चळवळी आणि स्त्रियांचे योगदान | प्रा. डॉ. जाधवर बी.डी. | 42 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतीकारी स्त्रियांचे योगदान | प्रा. डॉ.कदम मोतीराम विठ्ठलराव | 45 |
| 13 | बौध्द संघातील स्त्रियांचे योगदान : एक अभ्यास | प्रा. डॉ.रामभाऊ देवराव काशीद | 50 |
| 14 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य | डॉ. सतीश खरात | 53 |
| 15 | स्त्रीवादी साहित्य कादंबरी (१८५० ते १९५०) एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप. | प्रा. श्री. अमोल अरूण कुंभार | 56 |
| 16 | शिलाहारकालीन जैन धर्मिय स्त्रियांची कामगिरी | कु. वनिता गंपू कुंभार | 61 |
| 17 | प्राचीन, मध्ययुगीन,आधुनिक स्त्रीजिवन एक अभ्यास | प्रा. डॉ. सौ. एस. पी. लाखे | 64 |
| 18 | सेमिनारविषय :कोरोनामहामारीचा महिलांच्या जीवनावर झालेला दूरगामी परिणाम | चित्रा भारत पगारे /डॉ. जयश्री महाजन | 71 |
| 19 | सातवाहन नृपती हाल संपादित गाहासत्तसई (गाथासप्तशती) तील स्त्रीजीवन | प्रा. डॉ.माधवी महाके / श्रीमाला के.जी | 76 |
| 20 | जागतिकीकरण आणि भारतीय स्त्री : एक सामाजिक दृष्टीकोन | डॉ. गजानन रा. मुधोळकर | 82 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 343(CCCXLIII)
ISSN : 2278-9308
March, 2022

# भारतीय क्रांतीकारकांच्या चळवळी आणि स्त्रियांचे योगदान

प्रा. डॉ. जाधवर बी.डी.
इतिहास विभाग प्रमुख) बलभीम महाविद्यालय, बीड मो.नं. ९४२१३५०८७३

**प्रस्तावना** -

जागतीक इतिहासाच्या निर्मीती प्रक्रीयवर आपण आंतर्मुख होऊन थोडी नजर टाकली तर असे स्पष्ट होते की प्रत्येक देशाच्या इतिहासात विविध चळवळींचा उदय झालेला आहे. मग त्या चळवळी धार्मीक सामाजिक किंवा राजकीय शैक्षणीक अशा विविध क्षेत्राशी निगडीत होत्या. मग चिनमधील शेतकरी चळवळ सुधारणावादी चळवळ असेल. याशिवाय अमेरिका, इंग्लंड, जपान शिवाय जगातील विविध देशात विविध चळवळी उदयास आलेल्या होत्या. त्या चळवळी पैकी भारताचा इतिहास पाहिला तर असे स्पष्ट होते की, जगामध्ये घडून आलेल्या विविध चळवळीच्या तुलनेत भारता मध्ये जास्त चळवळीचा उदय झाला होता. कारण परकीयांच्या वर्चस्वातुन मुक्त होण्यासाठी भारतीयानी कालखंडानुरुप चळवळी उभारुन त्यांचा वेगवेगळ्या नावाने उल्लेख केलेला आहे हे भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासाचा मागोवा घेतल्या नंतर आपणास स्पष्ट होते. इ.स. १७५७ च्या प्लासीच्या लढाईने इंग्रजानी बंगालमध्ये आपल्या राजवटीचे बिजारोपण केले आणी भारतीयांचे स्वातंत्र्याचे हक्क ताब्यात घेऊन त्यांना पारतंत्र्यात जोखडण्यास प्रारंभ केला. त्यामुळे या सर्व गोष्टीवर मात करण्यासाठी आनेक भारतीय समाज सुधारक, विचारवंत तत्वज्ञ यांनी समाज संघटीत करुन भारतीयांच्या बळावर इंग्रजांच्या विरोधात संघर्ष किंवा चळवळी उभ्या केलेल्या होत्या. मग त्यामध्ये १८५७ चा उठाव किंवा चळवळ. तसेच १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झल्यानंतर काँग्रेसचे नेतृत्व करणाऱ्या अनेक धूरिनानी ब्रिटिश साम्राज्यवादाला विरोध म्हणून आंदोलने चळवळी उभ्या केलेल्या होत्या. १८८५ ते १९०५ या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या बालेवस्थेच्या काळात फारशी आंदोलने जरी झाली नाहीत तरी १९०५ मध्ये जेंव्हा लोकमान्य टिळकांच्याकडे काँग्रेसचे नेतृत्व आले त्या काळापासून आनेक चळवळी उदयास आल्या होत्या. उदयास आलेल्या चळवळीचे आगदी खंबीरपणे समर्थन लोकमान्य टिळकांनी केलेले होते. परंतु भारतीयांच्या दुर्देवाने १९२० मध्ये जहाल युगाचा शेवट झाला म्हणजे लोकमान्य टिळकांचे निधन होऊन काँग्रेसच्या नेतृत्वाची जबाबदारी हि महात्मा गांधी यांच्याकडे आली. मग गांधी युगात तर जहाल युगाच्या तुलनेने जास्त चळवळी उदयास आल्या. सविनय कायदे भंग, असहकार, भारत छोडो आंदोलन, मिठाचा सत्यागृह, क्रांतीकारकांच्या चळवळी मग त्या विविध प्रांतातील चळवळी असोत किंवा देशातील चळवळी असोत अशा आनेक चळवळी उदयास आलेल्या आहेत.

अशा चळवळी पैकी इंग्रजी साम्राज्यवादास विरोध करण्यासाठी जिवाची पर्वा न करता आनेक स्वाभिमानी तरुण पुढे आले व त्या तरुणांनी देश रक्षणासाठी प्राणांची आहुती देण्याची मानसिकता तयार करुण क्रांतीकारकांची संघटणा उभारली होती, मग या क्रांतीकारकांच्या संघटनेत सहभागी तरुणांनी देशाच्या कानाकोपऱ्यात ब्रिटिशांच्या म्हणजे देशाच्या शत्रूच्या विरोधात चळवळी हाती घेतल्या, उभारलेल्या क्रांतीकारकाच्या चळवळीत देशातील काही स्त्रियांचा पण सहभाग होता. त्याविषयी या शोध निबंधात खालील प्रमाणे माहिती नमूद केलेली आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये ज्या प्रमाणात क्रांतीकारक पुरुषांचे योगदान आहे तसेच भारतीय क्रांतीकारी स्त्रीयांचे पणयोगदान आहे. इ.स. १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली आणि नंतर मात्र स्वराज्य स्वदेशी राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार अशा विविध कार्यक्रमांना देशातील विविध भागातील जनता सहभागी झाली हे करत असताना त्यांनी असे घोषीत केले की राज्यकर्त्यांची हिंसा करणे हे पाप आहे असे म्हणता येणार नाही. कारण आम्ही करतो ते काम मातृभूमीसाठीचे पवित्र कार्य आहे. असे क्रांतिकारकांचे मत बनले होते त्यामुळे त्यांनी विविध मार्गाचा आवलंब करुणक्रांतीकारकांच्या चळवळी सुरु झालेल्या होत्या अशा स्त्रीया खालील प्रमाणे आहेत.

**वीणा दास** :- वीणा दास हि एक महिला क्रांतीकारक होत्या. त्यांच्या कार्याचा अढावा घेताना असे स्पष्ट होते की नेताजी सुभाष चंद्रबोस यांचे गुरु कलकत्त्याच्या संस्कृत महाविद्यालयाचे प्राचार्य वेणी माधवदास यांच्या त्या कन्या होत्या. त्यांचा जन्म १९१२ मध्ये झाला होता. वीणा दास यांच्यावर वडिलांच्या देशभक्तीचा फार मोठा संस्कार झालेला होता. त्यामूळे भारतात जेंव्हा सायमन कमीशन आले तेंव्हा सर्व मैत्रीनीना एकत्र करुन कमीशनचा निषेध केला होता. या शिवाय भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्वयंसेविका म्हणून त्या